# दादांचे स्नेह-दर्शन



विमला

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

# दादांचें स्नेहदर्शन—

•

——विमला

# बहिणीची हांक

★

वाचकांसाठीं एक स्नेह भेट मीं आणली आहे. दादांच्या सहवासांत एक गोष्ट लक्षांत आली. स्नेहाचें सामाजिक मूल्य निर्माण व्हावें, त्याचें सांस्कृतिक महत्त्व समाजाच्या ध्यानांत यावें यासाठीं त्यांच्या जिवाचा कोण आटापिटा. प्रांताच्या विधान-सभेंत दादा पांच वर्षें राहिले. तेथें हि ती च तळमळ ! स्त्री-जीवनांत क्रान्ति झाली पाहिजे यासाठीं घरींदारीं दादा अखंड प्रयत्नशील राहिले. त्या क्रांतीचें अधिष्ठान हि भावरूप स्नेह च ! भू-दान-मूलक क्रांतीचें, दादा, पाईक बनले. पण या क्रान्तींत हि त्यांनीं सख्य-प्रवण बंधुत्वमूलक प्रक्रियेचें च गूणगान गाईलें.

वेळोवेळीं दादांशीं होणाऱ्या माझ्या चर्चेंतील महत्त्वाचे मुद्दे मीं टिपून ठेवले. निरनिराळ्या पत्रांतील उतारे संकलित केले. बहिणीनें दिलेली लहानशी भेट सारी भावंडें गोड करून घेतील अशी आशा आहे.

मणिभुवन,
लेबरनम रोड, मुंबई–७
ता० ६–३–५७

—विमला

# अनुक्रमणिका

★


आशीर्वाद  दादा धर्माधिकारी ५
स्नेह-सूत्र  विनोबा ७
क्रान्ति ९
क्रान्ति आणि संक्रान्ति ९
अहिंसात्मक क्रान्ति १०
सख्ययोगी क्रान्ति ११
साधना आणि समाजसेवा १२
जहां प्रेम तहां नेम नहीं १२
माझा स्नेहपन्थ १२
स्नेहाची शक्ति १३
मानवी विग्रह १३
मूलभूत सत्प्रवृत्ति १४
स्नेह आणि भगवत्भक्ति १४
स्नेह-रसायन १५
स्नेह व साधना १५
प्रेमाची परिसमाप्ति १६
ईश्वरनिष्ठेंतून मानवनिष्ठा १६
स्नेहाचें आलंबन १६
स्नेहासाठीं सामाजिक तपस्या १७
स्नेह-साधना १७
प्रेम पराभूत होत नसतें १८
इहलोकींचें अमृत १८
भावरूप आणि विधायक स्नेह १८
निरुपाधिक स्नेह १९
सह-जीवनाचें अनुष्ठान १९
स्नेह आणि संस्कृति २०
स्नेह आणि सेवा २०
आस्तिकतेची खूण २१
कौटुंबिक स्नेहाचा विकास २१
विश्व-कुटुंबाकडे २१
जीवनमय मुक्ति २२
अनास्था आणि अनासक्ति २३
सर्वोदयी विश्व-विजय २३
आवाहनांतील सौख्य २४
आतां एक च तळमळ २४

# आशीर्वाद

★

यांत जें कांहीं उज्ज्वल, उदात्त आणि ग्राह्य असेल तें तुझें आहे. त्यांत माझें असें फार च थोडें आहे. राजानें माणिकमोत्यें व मोहरा जमिनींत खोल पुरून ठेवल्या. नंतर ती दौलत खणून काढायला मजूर लावले. लोकांना वाटलें हें गुप्त धन भुईच्या गर्भांतून निघालें. तसें हें आहे. यांत स्नेहाची दृष्टि आहे, स्नेहाचें दर्शन हि आहे. स्नेहाच्या दृष्टीनें अलम दुनियेचा नूर च पालटतो. स्नेह किती हि संकुचित असला तरी तो स्वतःचा तोकडा स्वार्थ सोडल्यावांचून टिकूं शकत नाहीं. म्हणून जीवनाची उन्नति स्नेहाच्या दृष्टींत व दर्शनांत आहे. स्नेह व्यापक झाला म्हणजे जीवत्वाचीं बंधनें शिथिल होत जातात आणि मोकळ्या आनंदी जीवनाचा लाभ होतो. व्यापक स्नेह हें मुक्त समाज-जीवनाचें अमृत-तत्त्व आहे. स्नेहानें माणूस भेदांतून अभेदाकडे सारखा आणि न कळत प्रगति करीत जातो. दुजाभाव व परकेपणा यांचा निरास होत जातो. शेंवटीं तादात्म्य सिद्ध होतें. कैवल्य च उरतें. भेद संपला; बंधनें तुटलीं. हें च 'स्नेहचक्र' म्हणायचें. धर्मचक्र, काल-चक्र, दैवचक्र, संसारचक्र, यज्ञचक्र अशीं कितीतरीं चक्रें प्रसिद्ध आहेत. हा सूर्य, ही पृथ्वी आपापल्या अक्षांवर फिरतात. पण मानवी व्यवहारांचें चक्र स्नेहाच्या अक्षावर फिरतें. मानवा-मानवाच्या परस्पर-संबंधांचें, आप्तत्वाचें व आत्मभावाचें प्रवर्तन स्नेहानें च होतें. म्हणून स्नेहचक्र हें च विश्वाचें आणि विश्व-नियंत्याचें पवित्र व जीवन-विकासी सुदर्शन चक्र !

माझ्या व्यक्तित्वांत हें चक्र स्नेहीजनांच्या कृपा-प्रसादामुळें च गतिमान झालें. म्हणून येथें जें जें कांहीं मंगलकारक, मधुर व उन्नतिकारक असेल तें तुझें आहे. तुझ्या जीवनांत या स्नेहाचें अवीट माधुर्य, व्यापक सौहार्द्र आणि सार्वत्रिक सख्यभक्ति यांच्या रूपानें नित्य प्रकट होत राहो, हा च तुझ्या दादाचा आशीर्वाद आहे.

गया
ता० ७–९–५५.

—दादा धर्माधिकारी.

# स्नेह-सूत्र

★

स्नेहाच्या कामाला प्रस्तावनेची गरज च काय? ज्ञान विषयाला प्रस्तावनेची गरज. पण इतका विवेक तरी स्नेहाला सुचला पाहिजे ना?

"स्नेह" म्हणजे आपल्या साध्या मराठींत "जिव्हाळा". ज्या कामांत स्नेह म्हणजे जिव्हाळा नाहीं तें सहज च निर्जीव होऊन जातें.

सर्व गुणांना सजीव रूप स्नेहामुळें येतें. गुणांना जर मण्यांची उपमा दिली, तर स्नेहाला सूत्राची उपमा शोभेल. म्हणून गुण-गणनेमधें स्नेहाची गणती न केलेली बरी.

गुण-मालिकेंत स्नेहाला बसविलें कीं त्याचें रूपांतर आस्तिकतेंत होतें आणि मग स्नेह कुठें हि राखूं नये, असें म्हणण्याची गरज पडते. "यः सर्वत्र अनभिस्नेहः", असें गीतेनें म्हणून ठेवलेलें च आहे.

पण त्याचा अर्थ ज्ञानदेवांनीं अद्भूत च केला. "अभिस्नेह" म्हणजे "उणा-अधिक स्नेह" असा अर्थ करून "अनभिस्नेह" म्हणजे "ज्याचा सगळीकडे समान स्नेह आहे", असा अर्थ ज्ञानदेवानें निष्पन्न केला. म्हणजे गुण-मालिकेंतून उठवून सूत्र-स्थानीं त्याला बसवून दिलें.

विश्वांतील भिन्न-भिन्न अविर्भाव एका च मधुर मूर्तीचे असतांना त्यांतील कांहींकडे अधिक ओढ, कांहींकडे कमी ओढ, अशी जोंपर्यंत अनुभूति असते, तोंपर्यंत स्नेहसूत्र हातीं आलें नाहीं,

फार तर स्नेह-गुण च हातीं आला,–जो दुसऱ्या बाजूनें दोषरूप हि आहे–असें समजलें पाहिजे.

"स्नेहा"चा अर्थ संस्कृतांत "तेल" असा हि होतो. घर्षण टाळण्याचें काम तेल करूं शकतें. पण तेलाचा प्रयोग करून हि घर्षण न टळलेलें आणि कधीं कधीं वाढलेलें दिसतें, तेव्हां त्या तेलांत कचरा मिसळला आहे असें समजावें.

चरख्याला तेल दिलें कीं त्याचा शब्द कमी होतो. स्नेह निःशब्द च असणार ! तेव्हां आतां ही प्रस्तावना, जी विनाकारण च लिहिली गेली, संपविल्याशिवाय गति नाहीं.

कुजेंद्री, ओडिसा<br>ता० २१–९–१९५५

—विनोबाचे आशीर्वाद

# दादांचें स्नेहदर्शन—

## क्रान्ति

क्रान्तीला फक्त बुद्धीची खात्री पटवून देणें पुरेसें नाहीं. हृदय पेटलें पाहिजे. बुद्धीचें समाधान करून हृदयें पेटविण्याची जादू वक्तृत्वांत हवी. क्रान्तीला विचार जसा हवा तशी अन्त:करणाची तळमळ हवी. व्यक्तित्वाचें उपादान जितकें शुद्ध व तेजस्वी, तितकी शब्दांत जादू.

■ ■ ■

## क्रान्ति आणि संक्रांति

उद्यां मकरसंक्रांत. दरेक व्यवहारांत सुरळीतपणा, सरळपणा व गोडी आणि सौंदर्य कसें आणतां येईल याचा विचार करण्याचा दिवस. भू-दान-यज्ञाची क्रान्ति तिळगुळाच्या प्रक्रियेची क्रान्ति आहे. म्हणून च त्या प्रक्रियेंत अनुद्वेगकर वाणी आणि अविरोधी वृत्तीचें महत्त्व आहे. दरेक बारीक-सारीक व्यवहारांत लोकांना न दुखवितां खरें बोलण्याची आणि खरेपणानें वागण्याची कला साधली पाहिजे.

■ ■ ■

## अहिंसात्मक क्रान्ति

षड्विकारांनीं केलें आहे. मत्सर म्हणजे परोत्कर्षासहिष्णुता. दुसरा आपल्यापेक्षां जादा गुणवान् आहे, बलवान् आहे, धनवान् आहे, रुपवान् आहे, सत्तावान् अथवा भाग्यवान् आहे हें माणसाला खुपतें. त्याच्या मनांत स्पर्धा उत्पन्न होते. या स्पर्धेचा किंवा अहमहमिकेचा जन्म मत्सराच्या पोटीं झालेला असल्यामुळें प्रतिस्पर्धेंत शत्रुत्व निर्माण होतें. गरिबांचे जे कैवारी आहेत त्यांच्या मनांत खोल कोठें तरी श्रीमंतांबद्दल असा च मत्सर दडलेला असतो. तो सामुदायिक किंवा वर्ग-व्यापी झाला म्हणजे त्याच्या ठिकाणीं गुणाचा भास होऊं लागतो. व्यक्तीच्या बाबतींत स्वार्थ, चोरी, आक्रमणशीलता हे दोष आहेत. राष्ट्राच्या बाबतींत ते च गुणीभूत ठरतात. त्या च प्रमाणें हा मत्सर वर्ग-द्वेषाच्या गोंडस नांवाखालीं क्रांतीचें तत्त्व म्हणून दिमाखानें मिरवूं लागतो. क्रांतींत त्यामुळें त्वेश व उग्रता येते.

अहिंसेच्या प्रक्रियेंत सार्वत्रिक सख्य-भाव पाहिजे. सगळे च सखे, कामरेड, सोबती-सोयरे! इतरांच्या दुःखांत दुःख वाटतें तसें सुखांत सुख हि वाटतें. जे भाग्यवान् व वैभववान् आहेत त्यांच्या भाग्याचा व वैभवाचा हेवा वाटत नाहीं. त्यांच्या त्यांच्या स्वार्थांधतेबद्दल, अन्यायाबद्दल दुःख वाटतें. पण त्यांचे दुर्गुण हि स्वतःचे च वाटतात. त्यामुळें सख्यत्वाच्या प्रतिकारांत प्रतिपक्षी कोणी च नसतो. मत्सराला वाव नसतो. "अशाश्वत संग्रह" करणारा अविवेकी वाटतो. त्याचा संग्रह भाररूप वाटतो. तेथें मत्सराला वाव कोठला ?

## सख्ययोगी क्रांति

विनोबांची चळवळ "माउलीहूनि मायाळ, चंद्राहूनि शीतल, पाण्याहून पातळ, कल्लोळ प्रेमाचा" अशी आहे. म्हणून लोकांना तिच्यांत "जोम" व "आवेश" दिसत नाहीं. ती सख्य-भावनेची चळवळ आहे. तिच्यांत प्रतिकार आला तरी तो सख्याच्या पोटीं जन्मलेला असणार ! त्यांत जय–पराजय, स्वपक्ष व परपक्ष अशी भावना नसणार ! आज तर सगळें च संयोजन युद्धाच्या भूमिकेवर चालतें. अन्नाची आघाडी युद्धाच्या भूमिकेवरून चालणार ! शान्ति व बन्धुत्व यांचें संयोजन हि युद्धाच्या च भूमिकेवर झालें तर त्याला चव. विनोबांची चळवळ एकमेकांना अंतरलेल्या माणसांना जवळ आणण्याची चळवळ आहे. तिच्यांत लढयाचा त्वेश कसा येणार ? सख्यत्वामधें उत्साह आणि तेज ज्यांना वाटत नाहीं त्यांचें मन व बुद्धि अंध गतानुगतिकत्वाच्या आहारीं गेली आहे. विनोबांची चळवळ झोपडी-झोपडींत जळतें कोलीत टाकून भडका उडवून देणारी नाहीं. ती असंख्य ज्योति पाजळील, खोपटां-खोपटांतून प्रकाश निर्माण करून सारें भुवन उजळणारी ती चळवळ आहे. लोक म्हणतात एवढ्या प्रचंड अंधारांत या चिमुकल्या जागृत ज्योति कितीसा प्रकाश पाडणार ? विनोबा म्हणतात, "अमावस्येच्या काळ्याकुट्ट अंधारांत हि एका इवल्याशा काजव्याचा देखील प्रकाश दडपण्याचें सामर्थ्य नाहीं. ही चळवळ निर्द्वंद्वी, नित्यसत्वस्थी, निर्योगक्षम आत्मवान् व्यक्तींची आहे.

■ ■ ■

## साधना आणि समाज–सेवा

जेव्हां माणसामधें देव पाहण्याचें स्वरूप साधनेला प्राप्त होतें, तेव्हां ती सेवेमधें परिणत होते. साधना कुठली आणि सेवा कुठली, हें निवडून काढतां येत नाहीं. "मी सेवा करतों" ही भावना उरत नाहीं. अहंता सेवेमधें विरघळून जाते. साधना व्यापक बनते. ती मानव्यव्यापी स्वरूप धारण करते. ही साधना आणि ही समाज-सेवा असा भेद उरत नाहीं. अमुक आत्म-संतोषासाठीं आणि तमुक लोकाराधनेसाठीं असा फरक उरत नाहीं. साधना निराळी आणि जबाबदारी निराळी, कर्तव्य वेगळें आणि अधिकार वेगळा असा हि भेद करतां येत नाहीं. आत्मोद्धार व लोकसंग्रह एकमेकांत मिसळतात.

■ ■ ■

## जहां प्रेम तहां नेम नहीं

प्रेम हा ईश्वराचा गुण आहे. तें दैवी संपत्तीचें लक्षण आहे. देवाजवळ आपण शिष्टाचाराचे नियम किंवा मर्यादा पाळीत नाहीं. जसे आपण असूं, तसे त्याच्यापुढें नम्रभावानें जातों. जेथें शुद्ध स्नेह असेल, तेथें हि आपली स्थिति अशी च असते. तेथें मर्यादा किंवा विनय यांचा प्रश्न च उरत नाहीं.

■ ■ ■

## माझा स्नेह–पन्थ

माझ्या सोबत्यांपैकीं व मार्गदर्शकांपैकीं कांहीं आत्मनिष्ठ आहेत आणि कांहीं सेवानिष्ठ आहेत. जे आत्मनिष्ठ आहेत

यांचा लोकसंग्रह हि पुष्कळसा "आत्मनिष्ठ" च असतो; जे सेवानिष्ठ आहेत त्यांची आत्मोन्नतीची साधना हि बरीचशी लोकसंग्रहात्मक असते. मी आत्मनिष्ठ तर नाहीं च सेवेची मला आवड नाहीं. म्हणून माझा आपला "मुरारेस्तृतीयः पन्थाः" आहे. स्नेहपन्थ आहे.

■ ■ ■

## स्नेहाची शक्ति

स्नेहामधें चमत्काराची शक्ति आहे. श्रद्धेनें पर्वत देखील हालवितां येतो असा अनुभवी माणसांनीं निर्वाळा दिला आहे. निरपेक्ष स्नेहांत श्रद्धेपेक्षां कमी शक्ति नाहीं. त्यांत प्रति-दानाची व प्रति-मूल्यांची तर अपेक्षा नसते च पण प्रतिप्रेमाची हि अपेक्षा उरत नाहीं.

■ ■ ■

## मानवी विग्रह

आपण मर्त्यलोकांत आहोंत. मृत्युमुळें च जीवनाला मोल आहे. मृत्युमुळें जीवनाला ओघ आणि क्रान्ति आहे. हीं पार्थीव शरीरें हि मृत्युमुळें च इतकीं प्रिय व अमूल्य वाटतात. तीं नश्वर असतील; पण त्यामुळें कमी पवित्र, कमी सुंदर किंवा कमी दिव्य नाहींत. शरीराची आसक्ति निराळी आणि शरीराची कदर निराळी. शरीराची किंमत आहे म्हणून च तर दया-माया, करुणा, परोपकार, सेवा-शुश्रूषा या पुण्यकर्मांना अवकाश आहे. देवाचा विग्रह देखील किती हि शुद्ध सत्वमय असला तरी "विग्रह"

असल्यामुळें सान्त च असतो. पण म्हणून तो कमी पवित्र असतो असें थोडें च आहे ?

■ ■ ■

## मूलभूत सत् प्रवृत्ति

माणसें दुरून जितकीं वाईट दिसतात तितकीं जवळून दिसत नाहींत. दरेक माणसाच्या अन्त:करणांत लोकांनीं आपल्याला चांगलें समजावें अशी वृत्ति दडलेली असते; त्यामुळें त्याच्या सर्व प्रवृत्तींच्या आंत–खोल–सत्प्रवृत्ति च अव्यक्त रूपानें विद्यमान् असते. इतरांच्या जीवनांतील हा संदेश नित्य दिसूं लागला म्हणजे आपली वृत्ति परिनिष्ठित होत जाते. मानवनिष्ठा वाढत जाते आणि आपल्या हृदयांतील देव प्रकट होऊन आपल्या संकल्पांच्या द्वारें दैवी संकेत व्यक्त करतो.

■ ■ ■

## स्नेह आणि भगवद्भक्ति

सर्व बाह्य साधनांचा हेतु चित्तशुद्धि आहे. ज्या स्नेहानें आणि ज्या संवादानें चित्तशुद्धीला मदत होत असेल तो वैराग्या-इतका च पावन व मौन व्रताइतका च उन्नतिकारक ठरेल. स्नेह हें हि एक व्रत च आहे. तो संवाद प्रार्थनेचा च एक भाग आहे. मानवाच्या व समाजाच्या स्वरूपांत भगवंताची आराधना करावी. अनंतरूपें धारण करणारा तो विश्वरूप भगवान् कधीं नारायणाच्या स्वरूपांत दिसतो तर कधीं नराच्या व समाजाच्या हि स्वरूपांत दिसतो. विठू महार व श्रीखंड्या हीं कांहीं त्याचीं शेवटलीं

स्वरूपें नव्हत. तो नित्य नव-नव्या रूपानें नटतो. म्हणून म्हणतों कीं उदात्त स्नेह व भगवत्-भक्ति यांच्यांत विरोध नाहीं.

■ ■ ■

## स्नेह-रसायन

बौद्धिकतेचा ताठा आणि स्नेहाळुतेचा अभिमान आवरून लोक-जीवनाशीं समरस होण्याची धडपड करावी. स्नेह हें एक च रसायन असें आहे कीं ज्यांत अभिमान संकुचितपणा आणि अभिनिवेश पार विरघळून जातात. म्हणून प्रेमरूप भगवंताची उपासना करावी.

■ ■ ■

## स्नेह व साधना

स्नेह आणि साधना यांच्यांत भेद राहिला, तर स्नेहाचें पर्यवसान मोहांत होईल. आणि साधनेचें पर्यवसान जुगुप्सेंत होईल. गीता-रहस्यांत दैवी संपत्तीच्या गुणांमधें विरोध कल्पिला आहे. क्षमा आणि तेज यांचा विरोध, सत्य आणि अहिंसा यांचा विरोध, करुणा आणि शौर्य यांचा विरोध अशी विपरित कल्पना केली आहे. तेजावाचून क्षमा, अहिंसारहित सत्य, करुणारहित शौर्य, या गुणांना कांहीं अर्थ तरी उरेल का ? स्नेहात्मक साधना आणि साधनामय स्नेह यांच्यांतील फरक माझ्या ध्यानांत येत नाहीं.

■ ■ ■

## प्रेमाची परिसमाप्ति

स्नेहाला सेवेची संधि लागत नाहीं. बरोबर जगणें स्नेहाला पुरेसें वाटतें. एकमेकांचीं कामें करणें सेवा नव्हे, मदत हि नव्हे, तो फक्त बरोबर जगण्याचा आनंद आहे. प्रेमाचा आरंभ आपुलकीं-तून होतो आणि परिसमाप्ति तादात्म्यांत होते. "तो मी आहें" या भावनेंत दुसऱ्याला विषय किंवा संपत्ति मानतां येत नाहीं. तेथें मालकीच्या भावनेला थारा नाहीं. त्यामुळें खरा स्नेह नेहमीं शारीरिकतेच्या वर उठवितो.

■ ■ ■

## ईश्वरनिष्ठेंतून मानवनिष्ठा

ईश्वरनिष्ठा आणि ब्रह्मचर्य यांच्या पोटीं च मानवनिष्ठा निपजत असते. ईश्वरनिष्ठेंतून निष्पन्न झालेल्या मानवनिष्ठेनें मानवप्रेम क्षितिजव्यापी होतें. मात्र ती मानव-निष्ठा अस्मानाच्या अनन्त पोकळींत तरंगत राहणार नाहीं तिला जमिनीवर आधार लागेल. व्यापक मानवप्रेम म्हणजे शून्यांचा बाजार नव्हे. सगुणरूपाचें च ध्यान निर्गुण निराकार देखील भावरूप आहे. ब्रह्मरूप आहे. विश्वरूप आहे. विशिष्टाचा निषेध म्हणजे व्यापकाची आराधना नव्हे.

■ ■ ■

## स्नेहाचें आलंबन

दूर राहून केलेलें प्रेम गुणनिष्ठ असलें तरी आध्यात्मिक च असतें असें नाहीं. भावनात्मक प्रेमाचें हि आलंबन सूक्ष्म शरीर च

असतें. आत्म्यावरील प्रेम विशिष्ट राहूं च शकत नाहीं. आपण दुरून प्रेम करीत असलों तरी त्या त्या व्यक्तिवर च करतों. अर्थात् तें विशिष्ट असतें व म्हणून च त्याचें आलंबन गुणात्मक आणि भावनात्मक सूक्ष्म शरीर असतें.

■ ■ ■

## स्नेहासाठीं सामाजिक तपस्या

भावी समाज-रचना आर्थिक स्वार्थाऐवजीं स्नेहाच्या पार-मार्थिक पायांवर उभारायची आहे ना ? तो स्नेह का अस्मानांत राहील ? निव्वळ भावनात्मक राहील ? त्या स्नेहाकरितां खस्ता खाणें, निरपेक्ष कष्ट करणें, हें च सामाजिक तप होय. तपावाचून तत्त्वज्ञान मुरत नाहीं. माणूस मोहवश व विकारवश न होतां जर जागरण, भूक, शीतोष्ण व सुखदुःख स्नेहाकरितां सोसूं लागला तर तें तप च ठरेल. स्नेहाचें प्रत्यक्ष अनुष्ठान हें च पवित्र तप होय.

■ ■ ■

## स्नेह-साधना

ज्या प्रेमाला शब्दांची गरज नाहीं, जें स्पर्शानें परिमित होऊं इच्छित नाहीं त्याचा महिमा मला कसा कळावा ? माणूस समोर असलें म्हणजे त्याच्या मूर्तींतून च प्रेम अभिव्यक्त होतें. तें मला कळतें. त्याचें व्यक्तित्व च प्रेममय बनलेलें असतें. त्याच्या अस्तित्वांतून प्रेम-रश्मि फांकतात. पण माझी वृत्ति इतकी परिनिष्ठित नाहीं. ती ढोबळ आहे. परीस लोहावर रुसूं शकतो.

पण लोह रुसलें तर त्याचें सोनें कसें होईल ? "अय: स्पर्शलग्नं सपदि लभते हेमपदवीम्" म्हणून दोन्ही बाहू पसरून तें परिसाला कवटाळण्याकरितां आतुर असतें. "स्पर्शमणे, सुवर्णीकुरु मां मलिनं लोहम्" म्हणून टाहो फोडतें. परिसाचें नांव "स्पर्शमणि" आहे. पण स्पर्शाची आकांक्षा परिसाला नसते. लोहाला च असते.

■ ■ ■

## प्रेम पराभूत होत नसतें

स्नेहानें कधीं हि हार मानूं नये. नम्रपणें आपली भूमिका पार पाडावी. निर्मळ व निरपेक्ष प्रेम कधीं च पराभूत होणार नाहीं.

■ ■ ■

## इहलोकींचें अमृत

म्हणे लाडानें मुलें बिघडतात ! प्रेमानें कां कुणी बिघडते ? ज्या प्रेमानें माणसें बिघडतील तें अमृत नव्हे. ती मदिरा असली पाहिजे. तिचा अंमल चढतो. प्रेम निर्मळ व निरपेक्ष असतें. त्यानें माणसें कधीं हि नासावयाचीं नाहींत.

■ ■ ■

## भावरूप आणि विधायक स्नेह

व्यापक स्नेहाच्या अधिष्ठानावर समाजाची उभारणी झाली पाहिजे. स्नेहाचें तें तत्त्व जितकें व्यापक तितकें च उत्कट

असतें. वैयक्तिक जीवनांत तें जिव्हाळयाच्या व अगत्याच्या रूपानें व्यक्त होतें. सत्य, अहिंसा, अपरिग्रह हीं तत्त्वें ज्याप्रमाणें वैयक्तिक आचरणांत प्रकट होतात, त्या च प्रमाणें स्नेहाचें भावरूप व विधायक तत्त्व हि प्रकट होतें.

■ ■ ■

## निरुपाधिक स्नेह

निरुपाधिक स्नेह सदैव बिनचूक मार्ग दाखवितो.

■ ■ ■

## सह–जीवनाचें अनुष्ठान

स्नेह जेव्हां साधना बनते, तेव्हां जीवनाला सहजीवनाच्या पवित्र अनुष्ठानाचें स्वरूप प्राप्त होतें. एकटें खाणें ही जर चोरी असेल तर एकटें जगणें ही फसवेगिरी आहे. बरोबर जगणें हें सहजीवनाचें मंगल अनुष्ठान. बरोबर मरणें हा सह-जीवनाचा परिपाक. बरोबर जगण्यांत मौज असेल, तर बरोबर मरण्यांत कांहीं कमी मौज नाहीं. "सहनौभुनक्तु" चा च तो हि एक भाग आहे. फक्त "जिजीविषा" जशी क्षुद्र तशी फक्त "मुमूर्षा" हि अधम. त्यांना "सह" हा उपसर्ग लागला कीं दोन्ही उदात्त व उत्कृष्ट ! सहमुमूर्षेनें मरण हि सामाजिक मूल्य बनतें. मृत्यूंतून अमृताकडे जाण्याची ही च प्रक्रिया आहे.

■ ■ ■

## स्नेह आणि संस्कृति

स्नेहशून्य साधना मानवी मूल्य बनूं शकत नाहीं. आणि साधनहीन स्नेह सांस्कृतिक मूल्य बनूं शकत नाहीं.

■ ■ ■

## स्नेह आणि सेवा

वैराग्याचा परिपाक जर आध्यात्मिकतेंत न झाला तर व्यक्तिवादाला तुटकपणाचें स्वरूप कसें येतें याचें प्रत्यंतर आश्रमांत राहिलेल्या कितीतरी व्यक्तींच्या जीवनांत पहायला मिळतें. त्यांच्या दृष्टीनें इतर म्हणजे सेवेचीं साधनें किंवा स्वतःच्या साधनेचीं जिवंत उपकरणें. अलीकडे एक नमूना पहायला मिळाला एक जण आजारी माणसाच्या सेवेला येऊन राहिले. सेवेंत च अभिनिवेश निर्माण झाला. याची सेवा आजारी माणसाला जाचूं लागली. तें माणूस कंटाळलें. सेवकाचा तिट्कारा आला. तरी याचा सेवाग्रह चालू च.

जीवनाचें तत्त्व, सत्व, उपादान, स्नेह आहे. सेवा नव्हे. स्नेहाच्या पोटीं सेवा उत्पन्न होऊं शकेल पण सेवा ही स्नेहाची जननी होईल च असें नाहीं. ज्या सेवेची परिणति परिसमाप्ति स्नेहांत होत नाहीं ती सेवा च नव्हे.

■ ■ ■

## आस्तिकतेची खूण

आस्तिकतेची सर्वांत मोठी खूण इतरांच्या ठिकाणीं सद्भाव व आत्मियता जागृत करणें ही आहे.

■ ■ ■

## कौटुंबिक स्नेहाचा विकास

हृदय-परिवर्तन, विचार-परिवर्तन, पदयात्रा, जनसंपर्क या श्रेयस्कर साधनांप्रमाणें च परम श्रेयस्कर साधन कौटुंबिक स्नेहाचा विकास हें हि आहे. या काळांत कुटुंबें उधळत आहेत; बंधुत्व वितळत आहे. अशा वेळीं सर्व साधनांपेक्षां या साधनांचें शतपट अधिक महत्त्व आहे. कौटुंबिकतेचा विकास आपल्या साधनेचें आधारभूत तत्त्व आहे.

■ ■ ■

## विश्व-कुटुंबाकडे

कौटुंबिक वृत्तीचा परिपोष करणें आपलें कर्तव्य आहे. समाजस्वामित्व किंवा ग्रामस्वामित्व स्थापन करण्याची कल्पना कम्युन मधें हि आहे. त्यांत भागीदारी आणि सह-परिश्रम असला तरी कौटुंबिकतेचा परिपोष आणि विकास करण्याची तरतूद नाहीं. ती जोंपर्यंत होणार नाहीं तोंपर्यंत कौटुंबिकतेला सामाजिक मूल्य प्राप्त होणार नाहीं. आणि कुटुंबसंस्थेचें पावित्र्य व सौंदर्य यांचें संरक्षण होऊं शकणार नाहीं.

कुटुंबाचा विस्तार म्हणजे च कौटुंबिकतेचा सामाजिक मूल्यांच्या दृष्टीनें विकास. त्यासाठीं कुटुंबियांविषयीं उत्कट

जिव्हाळा आणि अगत्य पण विशिष्ट वंश व रक्त यांच्याविषयींच्या अभिमानाचा त्याग असा दुहेरी प्रयत्न व्यक्तिगत जीवनांत करावा लागेल. रक्ताचा व सोयरिकीचा संबंध जेथें नाहीं तेथें कौटुंबिक नात्यांतील स्वाभाविक व निर्व्याज स्नेहाचा विकास करावा लागेल. कुटुंबीयांविषयींचा जिव्हाळा व अगत्य या वृत्तीला पोषक ठरेल. अशा रीतीनें कौटुंबिक मूल्यें समाजव्यापी करतां येतील.

संस्था, संघटना आणि समित्या--मग त्या आध्यात्मिक असोत अगर लौकिक– सर्वत्र अनुशासन आणि नियंत्रण संविधानावर किंवा सत्तेवर आधारलेलें दिसतें. कौटुंबिकतेचा संपूर्ण अभाव दिसतो. समान ध्येय, समान साधना आणि समान राहणीचा बुद्धिपूर्वक स्वीकार करून स्वेच्छेनें एकत्र राहणारांची ही स्थिति आहे. आणि आपण तर ग्रामकुटुंबें आणि त्यांच्या द्वारें विश्व-कुटुंबाच्या प्राण-प्रतिष्ठेचा संकल्प करतों. म्हणून धर्मशाळा, छात्रालयें, हॉटेलें, अतिथि-गृहें यांच्यापेक्षां कुटुंब-संस्थेविषयीं अधिक आस्था वाटावी असें माझें म्हणणें आहे.

■ ■ ■

## जीवनमय मुक्ति

लोकांना कंटाळून आम्हीं परलोकप्राप्तीची आशा कशाच्या बळावर धरावी ? "उत्तम लोका" ची प्राप्ति करून घ्यायला येथें च उत्तम "लोकांचा" संग्रह करण्याखेरीज दुसरी कला आम्हांला साधणार नाहीं. आमची "जीवन्मुक्ति" म्हणजे जीवनापासून मुक्ति नव्हे तर जीवन मय मुक्ति. तिची साधना लोकाभिमुख वृत्तीनें च होणें शक्य आहे. ही "लोकाभिमुखता"

किंवा " लोकपरायणता " म्हणजे " लोकैषणा " मात्र नव्हे. या लोकांत जें सुख मिळत नाहीं तें दुसऱ्या लोकांत मिळविण्याची आकांक्षा म्हणजे लोकेषणा ! या च लोकामधें मान-सन्मान, गौरव किंवा प्रतिष्ठा मिळविण्याची आकांक्षा ही देखील लोकेषणा. पण लोकांविषयीं निरपेक्ष स्नेह आणि त्या स्नेहामुळें त्यांच्या उपयोगी पडण्याची वृत्ति म्हणजे " लोकैषणा " नव्हे.

■ ■ ■

## अनास्था आणि अनासक्ति

अनासक्ति म्हणजे अनास्था आणि पगारदारी म्हणजे भाडोत्रीपणा अशी समीकरणें लोकांच्या मेंदूंत घट्ट बसलीं आहेत. माझा मात्र असा अनुभव आहे कीं माणूस जसजसें अनासक्त होत जातें तसतशी कामांतील उत्कटता व दक्षता वाढत जाते.

■ ■ ■

## सर्वोदयी विश्व-विजय

भूदान-यज्ञ आंदोलनांत पंथ नाहीं; ग्रंथ नाहीं; संप्रदाय नाहीं. मानव-मात्रांकरितां निरुपाधिक विश्वकुटुंब दीक्षेचा दिव्य मंत्र आहे. हा " दिग्विजय " सर्वांना विजयी करणारा आहे. येथें कोणाचा च पराजय नाहीं. सर्व दिशांना व्यापणारा आणि सर्वांचा विजय करणारा म्हणून च हा सर्वोदयी विश्वविजय !

■ ■ ■

## आवाहनांतील सौख्य

आज आपली भूमिका विवेकयुक्त प्रतीक्षेची आहे. विवेकयुक्त प्रतीक्षेंत अनास्था किंवा निष्क्रियता नसते. प्रतीक्षेंत उत्कंठा असते. प्रतीक्ष्याचा सारखा ध्यास असतो. ज्या नवीन मानवाचें आपण आवाहन करूं इच्छितों त्याचें ध्यान व चिंतन घडतें. त्याच्या स्वागताची तयारी करावी लागते. ती चालू क्षणांत च करावी लागते. चालू क्षण म्हणजे काळापासून अलग झालेला तुटक क्षण नव्हे; तो अनंत कालाचा अविभाज्य घटक आहे. म्हणून सांस्कृतिक प्रचारक "पुनरपि पक्ष: पुनरपि मास:" मधें जगत असतो. तो चालू क्षणांत वागतो आणि अनंत काळांत नांदतो. अखंड क्रियाशीलतेमुळें त्याला विरंगुळा मिळतो आणि प्रतिक्षणीं ताजें समाधान लाभतें.

■ ■ ■

## आतां एक च तळमळ

आतां एक च तळमळ आहे. देव कसा कळेल ? भक्तांनीं आळविलेला, ज्ञान्यांनीं पाहिलेला, तो च देव मला हि कळावा ही तळमळ. एरवीं दैव-विरहित जीवन परवडेल. मला तकलुपी, नकली कथलाचे देव नको आहेत. ते मला बाजारांत आढळतात; कोर्टकचेऱ्यांत आढळतात; चोरां-वाटसऱ्यांच्या हि देवळांत आढळतात. ते आर्थिक आकांक्षेंतून जन्माला आले आहेत. पारमार्थिक मूल्यांची स्थापना करणारे ते अवतार नव्हेत. क्रांतिवांचून अध्यात्म अर्थशून्य होईल आणि आध्यात्मिक अन्त:प्रत्यय आणि अन्त:प्रबोधाची तर्कनिष्ठ बौद्धिकतेपेक्षां ज्यास्त गरज आहे.

■ ■ ■

प्रकाशक :
भाऊ पानसे
ग्राम-सेवा-मंडळ
परंधाम विद्यापीठ
पो० पवनार वर्धा
* * *

किंमत नवे एकोणवीस पैसे
* *

मुद्रक :
गं. ना. सराफ
गजानन मुद्रणालय, वर्धा
* * *